# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 05 February 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- राष्ट्रपतींचं अभिभाषण हे विकसित भारताच्या संकल्पाला बळ देणारं असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- कृषीविषयक योजनांमध्ये कोणतीही अनियमितता सहन करणार नाही – केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांची लोकसभेत स्पष्टोक्ती
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज बीड दौऱ्यावर – विविध कामांचं भूमिपूजन तसंच लोकार्पण
- धनंजय मुंडे यांना राज्य मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची मागणी, आपल्या कार्यकाळातले सर्व निर्णय नियमानुसारच झाल्याचा मुंडे यांचा दावा

आणि

- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये १६ सुवर्ण पदकांसह महाराष्ट्र तिसऱ्या स्थानी कायम

****

राष्ट्रपतींचं अभिभाषण हे विकासित भारताच्या संकल्पाला बळ देणारं असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावर झालेल्या चर्चेला उत्तर देत होते. देशभरातून २५ कोटी लोक गरीबीतून बाहेर आल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. ते म्हणाले...

***''आदरणीय राष्ट्रपतीजी का ये उद्‌बोधन विकसित भारत के संकल्प को मजबुती देनेवाला है। नया विश्वास पैदा करनेवाला है। और जनसामान्य को प्रेरीत करनेवाला है। सारे अध्यन बार बार ये कह चुके है, की गत दस वर्षों में देश की जनता ने हमें सेवा करने का मौका दिया है। पांच***

***पांच दसक तक गरीबी हटाओ के नारे सुने है। और अब पच्चीस करोड गरीब गरीबी को परास्त करके बाहर निकले है। योजनाबद्ध तरीके से समर्पित भाव से अपनेपन की पुरी संवेदनशीलता के साथ जब गरीबों के लिये जीवन खपाते है तब ये होता है।''***

सरकारी योजनांचा लाभ घेत असलेल्या १० कोटी बनावट लाभार्थ्यांची नावं हटवून, खऱ्या आणि पात्र लाभार्थ्यांना सरकारी योजनेचा लाभ दिल्याचं, पंतप्रधानांनी सांगितलं. शासकीय खरेदीतही जेम पोर्टलच्या माध्यमातून पारदर्शक व्यवहार केले जात असून, यामुळे एक लाख १५ हजार कोटी रुपयांची बचत झाल्याची, तसंच शासकीय कार्यालयांच्या स्वच्छता मोहिमेतून भंगार विक्रीतून दोन हजार ३०० कोटी रुपये प्राप्त झाल्याची माहिती त्यांनी दिली. पंतप्रधानांच्या या उत्तरानंतर सदनानं हा प्रस्ताव संमत केला.

राज्यसभेत कालही धन्यवाद प्रस्तावावर चर्चा पुढे सुरू राहिली.

****

दरम्यान, पंतप्रधान मोदी आज उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभमेळ्याला भेट देणार आहेत. यावेळी ते त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान करणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

देशात गेल्या दशकभरात मोबाईल उत्पादन क्षेत्रात तीनशेहून अधिक कंपन्या कार्यरत झाल्या असून, १२ लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सामाजिक संपर्क माध्यमावरून ही माहिती दिली. ही बाब देशाच्या आत्मनिर्भरतेला पोषक असल्याचं, त्यांनी नमूद केलं.

****

कृषीविषयक योजनांमधे कोणतीही अनियमितता सहन केली जाणार नाही, तसंच प्रधानमंत्री पीक विमा योजनेत भ्रष्टाचार झाला असेल तर त्याची चौकशी करून दोषींवर कारवाईचं आश्वासन, कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिलं आहे. महाराष्ट्रात पिकविमा योजनेत गेल्या सरकारच्या काळात भ्रष्टाचार झाल्याचं वक्तव्य राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपा आमदार सुरेश धस यांनी केल्याचं, खासदार सुप्रिया सुळे यांनी काल लोकसभेत सांगितलं. याबाबत त्यांनी

विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना चौहान बोलत होते. महाराष्ट्र सरकारनं पिकविमा योजनेच्या सुधारणेसाठी पावलं उचलली आहेत, याकडे कृषीमंत्र्यांनी लक्ष वेधलं.

****

मुख्यमंत्र्यांनी धनंजय मुंडे यांना राज्य मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची मागणी, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केलेल्या आरोपांच्या आधारे तत्कालिन कृषीमंत्र्यांविरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी दानवे यांनी केली. ते म्हणाले...

> ***''शेतकऱ्यांच्या टाळूवरचं लोणी खाण्याचा हा प्रकार आहे. या राज्य सरकारने ताबडतोब धनंजय मुंडेचा राजीनामा घेतला पाहिजे. नाहीतर येणाऱ्या काळात अधिवेशन हे अधिवेशन धनंजय मुंडेच्या राजीनाम्याशिवाय मला वाटत नाही पुढे जाईल. सरकारने पुढाकार घेऊन या खात्याच्या मंत्र्यावर, आणि या राज्याच्या तत्कालीन सचिवावर सुद्‌धा गुन्हा दाखल केला पाहिजे अशा प्रकारची मागणी आपल्या माध्यमातून मी सरकारकडे करतो.''***

दरम्यान, धनंजय मुंडे यांनी काल पत्रकार परिषद घेऊन अंजली दमानिया यांनी केलेले आरोप फेटाळून लावले. आपल्या कार्यकाळातले सर्व निर्णय हे नियमानुसारच घेण्यात आल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. संतोष देशमुख हत्या प्रकरणावर काहीही भाष्य करण्यास त्यांनी नकार दिला. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यानं, आपण या विषयावर बोलणं, योग्य नसल्याचं मुंडे यांनी नमूद केलं.

****

शासकीय भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी, भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करताना कमी अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेस, एक वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. शेती, अकृषिक, निवासी, वाणिज्यिक तसंच औद्योगिक प्रयोजनासाठी आणि सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या जमिनींच्या बाबत हा निर्णय लागू होईल.

****

कर्करोगापासून बचाव करण्यासाठी राज्यात जनजागृती आवश्यक असल्याचं, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल जागतिक कर्करोग

दिनाच्या निमित्ताने कर्करोग तपासणी आणि जनजागृती मोहिमेचा राज्यस्तरीय शुभारंभ आबिटकर यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते.

नांदेड जिल्हा रुग्णालयातही जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एन. आय. भोसीकर यांच्या हस्ते जागतिक कर्करोग दिनाच्या कार्यक्रमाचं उद्घाटन झालं. यावेळी तज्ज्ञांकडून कर्करोग आजारासंबंधी मार्गदर्शन करण्यात आलं.

****

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत डिसेंबर महिन्यात घेण्यात आलेल्या शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल काल परिषदेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. उमेदवारांनी दहा दिवसांच्या आत गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिकेच्या छायांकीत प्रतीसाठी विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करावा, असं आवाहन परिषदेतर्फे करण्यात आलं आहे.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. जिल्ह्यातल्या विविध विकास कामांचं भूमिपूजन, खुंटेफळ साठवण तलाव जलवाहिनी कामाचा शुभारंभ, आष्टी इथल्या श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ मंदिर समाधी दर्शन आणि समाधी बांधकामाचं भूमिपूजन, तसंच जागतिक खो-खो स्पर्धेतल्या विजेत्या खेळाडूंचा सत्कारही फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

****

राज्य सरकारने ‘मागेल त्याला सौर कृषी पंप योजने’त शंभर दिवसांत दीड लाख पंप बसवण्याचं उद्दीष्ट निर्धारित केलं होतं, हे उद्दीष्ट महावितरणने साठ दिवसात पूर्ण केलं आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ही माहिती दिली. सहा डिसेंबरपर्यंत राज्यात ९७ हजार २९५ सौर कृषी पंप बसवण्यात आले होते. चार फेब्रुवारीपर्यंत महावितरणने आणखी ५३ हजार नऊ सौर कृषी पंप बसवले. त्यामुळे या योजनेत बसलेल्या सौर पंपांची संख्या एक लाख ५० हजार ३०४ झाली आहे. यामध्ये जालना जिल्ह्यात सर्वाधिक १८ हजार ४९४ पंप बसवण्यात आले असून, बीड जिल्ह्यात त्या खालोखाल १७ हजार ९४४, अहिल्यानगर १३ हजार ३६६, परभणी ११ हजार ७५५, छत्रपती संभाजीनगर नऊ हजार ३२९, हिंगोली आठ हजार ५३८, आणि धाराशीव जिल्ह्यात सहा हजार ७६५ सौर पंप बसवण्यात आल्याची माहिती महावितरणने दिली आहे.

****

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक ७६ पदकांची कमाई केली आहे. त्यात १६ सुवर्ण, ३३ रौप्य आणि २७ कास्यपदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत महाराष्ट्राचं तिसरं स्थान कायम असून, पहिल्या स्थानावर कर्नाटक तर दुसऱ्या स्थानावर सेना दलांचा समावेश आहे. तसंच, मणिपूर, मध्य प्रदेश, तामिळनाडू, दिल्ली, हरयाणा आणि पंजाब यांचा पहिल्या दहा संघांत समावेश आहे.

****

राज्य शासनानं काल विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. नवी मुंबईतले सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक राहुल कर्डिले यांची, नांदेडच्या जिल्हाधिकारीपदी बदली करण्यात आली असून, नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची, छत्रपती संभाजीनगर इथं वस्तू आणि सेवा कर विभागाचे सहायुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे. सध्या या पदावर असलेले मिलिंदकुमार साळवे यांची, छत्रपती संभाजीनगर इथंच अल्पसंख्याक विकास सहआयुक्त या पदावर बदली करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरचे अतिरिक्त विभागीय आयुक्त अविनाश पाठक यांची, बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी बदली करण्यात आली आहे.

****

बीड जिल्ह्यात काल ज्ञानराधा मल्टीस्टेट शाखेतल्या ठेवीदारांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला. ठेवीदारांचे अर्ज ऑफलाईन स्वीकारले जावेत, तसंच ठेवीदाराच्या ठेवी लवकरात लवकर परत द्याव्यात, या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आल्याचं ठेवीदार कृती समितीचे प्रमुख संदीप उबाळे यांनी सांगितलं.

****

जालना-राजूर रस्त्यावर बावणेपांगरी फाट्याजवळ मध्यरात्री भरधाव ट्रक आणि दुचाकी यांच्यात धडक होऊन झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला, तर एकजण गंभीर जखमी झाला. मृतांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्याचा समावेश आहे.

****

लातूर जिल्ह्यात २० फेब्रुवारी पर्यंत पंचसूत्री विशेष पंधरवडा राबवला जाणार आहे. यासाठी संबंधित यंत्रणांनी विशेष कार्यक्रमांचं आयोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकार्यांनी दिल्या आहेत.

****